# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

झो. पु. प्रा.
निवारा
पाया/र्सगं
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
चौथा मजला, काकडे बीज आयकॉन, पुणेविद्यापीठ रोड, अशोक नगर ई-स्क्वेअर जवळ, शिवाजीनगर, पुणे ४११००५.
दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०-२५६३०२३५
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाइट : www.srapune.gov.in


९८१
२७/१०/२०२१

जा.क्र. झोपुप्रा/तां-२/भोप्र/मा.क्र.२२६/९८९८/२०२१
दि. २६/१०/२०२१.

अंशत: भोगवटा प्रमाणपत्र (अप्पर ग्राउंड फ्लोअर करीता)

वाचा - १) प्रथम बांधकाम परवानगी (मूळ CC) जा.क्र.झोपुप्रा/६०६/२०१७ दि.०४/०५/२०१७.

२) सुधारित बांधकाम परवानगी जा.क्र.५४८/२०१९, दि. ०५/०३/२०१९.

३) योजनेचे वास्तुविशारद यांनी केलेला अंशत: भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा दि.३०/०९/२०२१ रोजीचा विनंती अर्ज.

४) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता दि.२२/१०/२०२१.

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

---

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ कलम ४५ प्रमाणे स.नं.३६/१+८+९, सि.स.नं.१३९, संत ज्ञानेश्वर नगर, एरंडवणा, पुणे येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतीस (विंगA+B) या कार्यालयाकडून जा. क्र झोपुप्रा/५४८/२०१९ दि.०५/०३/२०१९ अन्वये सुधारित बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीमधील अप्पर ग्राउंड फ्लोअरवरील १ ते ११ गाळ्यांचे काम पूर्ण झाल्याने योजनेचे वास्तुविशारद यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार इमारतीमधील अप्पर ग्राउंड फ्लोअर करीता अंशत: भोगवटा प्रमाणपत्र मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील मान्यतेनुसार देणेत येत आहे.

संयुक्त इमारत - wing A + wing B (पुनर्वसन + विक्री) च्या अप्पर ग्राउंड फ्लोअर वरील दुकान गाळ्यांचे बांधकाम

| अ. क्र. | मजले | सदनिका/दुकान क्र. (पुनर्वसन घटक) | | सदनिका/दुकान क्र. (विक्री घटक) | | एकूण दुकाने |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नकाशा मंजूरीनुसार | भोगवटा द्यावयाच्या प्रत्यक्षात स्थळपाहणी दरम्यान | नकाशा मंजूरीनुसार | भोगवटा द्यावयाच्या प्रत्यक्षात स्थळपाहणी दरम्यान | |
| १) | अप्पर ग्राउंड फ्लोअर | गाळा क्र. १, २, ३, ४, ६, ७, ८ | गाळा क्र. १, २, ३, ४, ६, ७, ८ | गाळा क्र. ५,९,१०,११ | गाळा क्र. ५, ९, १०, ११ | ११ गाळे |
| | | | | | | |
| इमारतीकरीता भोगवटा द्यावयाच्या एकूण गाळे / शॉप्स | | | | | | ११ गाळे |

पुनर्वसन घटक :- ७ गाळे
विक्री घटक :- ४ गाळे

एकूण :- ११ दुकान गाळे

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

प्रस्तुत प्रकरणी भोगवटा देणेकामी उक्त इमारतीच्या अप्पर ग्राउंड फ्लोअरवरील दुकान गाळ्यांच्या बांधकामास सबंधित आर्कीटेक्ट यांनी दिलेल्या उक्त भागाच्या पुर्णत्वाचे प्रमाणपत्र व विकसक यांनी दिलेले विहित नमुन्यातील हमीपत्राचे आधारे खालील नमुद अटी व शर्तीस अधीन राहून अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

अटी:-

१) प्रस्तुत अंशत: बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) अंशत: बांधकाम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले अंशत: बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) इमारतीचे सर्व बाजुने असणारे सामासिक अंतराचे क्षेत्र (All Marginal open space) खुले ठेवणे बंधनकारक आहे.

६) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

७) विषयांकित योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र असल्यास म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, उर्वरित टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

८) इमारतीचे सर्व सिमा भिंत बांधकाम, वृक्ष लागवड करणे योजनेतुन निर्माण होणारा टीडीआर मागणीपूर्वी पूर्ण करून सामासिक अंतराचे संपूर्ण क्षेत्र खुले ठेवणे बंधनकारक आहे.

९) सदर झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, अंशत: भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील तरतुदीनुसार सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

१०) सदर योजनेसाठी लागू होणारे शुल्क, जसे देखभाल खर्च, आणि पायाभूत सुविधा शुल्काची एकूण रक्कम टी.डी.आर. मागणीपूर्वी अदा करणे आवश्यक आहे.

११) लिफ्ट वापर ना-हरकत प्रमाणपत्र STP /ड्रेनेज विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र, राडारोडा बाबत ना-हरकत प्रमाणपत्र, घनकचरा व्यवस्थापनाबाबत आरोग्य विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र, पाणीपुरवठा विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र, वृक्ष लागवडीबाबत उद्यान विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र, रस्ता रूंदी / आरक्षण अंतर्गतचे क्षेत्राबाबत ना-हरकत प्रमाणपत्र तसेच सदर योजनेच्या इमारतीच्या उंचीबाबत Aviation Certificate आवश्यक तेथे अंतिम भोगवटा घेणेपूर्वी सादर करणे बंधनकारक राहील.

१२) स्थळपाहणी दरम्यान आढळून आलेले स्वतंत्ररीत्या गाळ्यांसमोर प्रस्तावित केलेल्या पायऱ्या मंजूर नकाशांनुसार नसल्याने त्यानुषंगाने जागेवरील प्रस्तावित केलेल्या पायऱ्यानुसार सुधारित बांधकाम परवानगी घेणे बंधनकारक आहे.

१३) अंशत: भोगवटा द्यावयाच्या गाळयांसमोर प्रस्तावित केलेले तात्पुरते पत्र्याचे शेड अंतिम भोगवटा देणेपुर्वी काढून टाकणे बंधनकारक आहे. त्याशिवाय पुढील टप्याचा टीडीआर अदा केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

प्र. सहायक संचालक नगररचना
झो.पु.प्रा., पुणे.

प्रत :- १) विकसक मे. स्पायर ग्रेस व्हेंचर
कुदळे पार्क, ६९३ नाना पेठ, पुणे ०२.

२) आर्कि प्राईड डिझायनर
१ साईनागोग रस्ता, लाल देवल सोसायटी,
युनिट नं.बी-१०, कॅम्प, पुणे ०१

३) तहसिलदार,ताबा विभाग, झोपुप्रा, पुणे, यांना माहितीस्तव सादर.

४) संगणक अधिकारी, झोपुप्रा, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.